सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य


सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२

Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com


क्रमांक:-डिओओ-२०२५/तीन/1429 दिनांक:- 04 SEP 2025

## परिपत्रक

विषय : ६५ वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०२५-२६.
विद्यार्थी विभाग ऑनलाईन पध्दतीने कलाकृती सादर करण्याबाबत.

दृश्यकला क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांचा विकास व्हावा याकरिता महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक उपक्रम म्हणून दरवर्षी कला संचालनालयामार्फत महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन आयोजित करण्यात येते. त्यानुसार कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अखत्यारितील शासकीय, शासनमान्य अशासकीय कला संस्थांना तसेच राज्यातील शासनमान्य व विद्यापीठांशी संलग्नीत कला महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, विद्यार्थी विभागाचे सन २०२५-२६ चे ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाकरिता विद्यार्थ्यांच्या कलाकृती ऑनलाईन पध्दतीने खालीलप्रमाणे स्विकारण्यात येणार आहे.

| ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्विकारण्याचा कालावधी | ऑनलाईन पध्दतीने कलाकृती स्वीकारण्याचे संकेतस्थळ | ऑनलाईन इमेज साईज | फाईल फॉरमॅट |
|---|---|---|---|
| दि.२०/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ | doa.maharashtra.gov.in | डिजीटल इमेज ही जेपीईजी (JPEG) मध्ये असावी. त्याची साईज किमान २१०० पीक्सेल लांबी / रुंदी (आडवी बाजू किंवा उभी बाजू). २५०० पिक्सेलच्या वर साईज नसावी | ईमेज ही जेपीईजी (JPEG) मध्येच असावी. ईमेज फाईलचे नाव पुढील प्रमाणे असावे, विद्यार्थ्याचे नाव_ विभाग_कलाकृतीचे शिर्षक_कलाकृतीचे माध्यम_कलाकृतीची किंमत |

तरी विद्यार्थ्यांच्या कलाकृती निर्देशित तारखांना सादर करण्याची व्यवस्था संबंधित संस्थेच्या अधिष्ठाता / प्राचार्य / विभागप्रमूख यांनी करावी.

२. ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांच्या कलाकृती सादर करतांना प्रथम संबंधित संस्थेचे अधिष्ठाता / प्राचार्य / विभागप्रमूख यांनी त्यांच्या संस्थेचा रजिस्टर आयडी व पासवर्ड doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तयार करण्यात यावे व सदर रजिस्टर आयडीवरुनच आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलाकृतीविषयक माहिती भरावी.

३. ऑनलाईन डिजीटल इमेजेसवरुन प्रदर्शनाकरिता कलाकृतींची निवड केली जाईल. प्रदर्शनाकरिता निवडण्यात आलेल्या कलाकृतींची यादी उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६. प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या मुळ कलाकृती स्विकारण्याच्या तारखा व ठिकाण उक्त संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. प्रर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती या संचालनालयास प्राप्त झाल्यानंतर त्यातून पारितोषिकाकरिता कलाकृतींची निवड करण्यात येईल. पारितोषिक विजेते कलाकारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

**७. सदर तारखात काही बदल झाल्यास तसे** doa.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

८. वरील प्रक्रियेबाबत अद्ययावत सूचना वेळोवेळी उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. तरी संबंधितांनी वेळोवेळी सदर संकेतस्थळाला भेट देऊन अद्ययावत माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच प्रदर्शनाच्या अनुषंगाने अटी शर्तींचे माहितीपत्रक सोबत जोडले आहे.

(डॉ.किशोर इंगळे)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. अधिष्ठाता/ प्राचार्य / विभागप्रमूख, कला संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व शासकीय, शासनमान्य अशासकीय कला संस्था (महाराष्ट्र राज्य)

२. सर्व विद्यापीठांशी संलग्नीत शासनमान्य कला संस्था (महाराष्ट्र राज्य)

६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

माहितीपत्रक

(विद्यार्थी विभाग)

प्रदर्शनाच्या आयोजनाच्या दृष्टीने सुलभता यावी व चित्रकला संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विशेष वाव मिळावा या हेतूने सन १९६९ पासून राज्य कला प्रदर्शनाचे दोन विभाग करुन (१) कला संस्थेतील विद्यार्थी व (२) व्यावसायिक कलाकार अशी दोन स्वतंत्र प्रदर्शन भरविण्याचे ठरविण्यांत आले. विद्यार्थी विभागाच्या प्रदर्शनासाठी खालीलप्रमाणे विभाग ठरविण्यात आले आहेत.

१) चित्रकला व रंगकला
२) शिल्पकला
३) उपयोजित कला
४) कला शिक्षण प्रशिक्षण
५) कला व हस्तव्यवसाय
६) मुलभूत
७) दिव्यांग

या प्रदर्शनासाठी एका स्पर्धकाला एका विभागात जास्तीत जास्त दोन कलाकृती पाठविता येतील.
सदर विभागात खालीलप्रमाणे विभागनिहाय पारितोषिके देण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | विभागाचे नाव | पारितोषिकांची संख्या | पारितोषिकांची रक्कम (रुपयात) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रथम | द्वितीय | तृतीय | चतुर्थ |
| १ | **चित्रकला व रंगकला** | ४ | १०,५०० | ७,८७५ | ५,२५० | २,६२५ |
| २ | **शिल्पकला** | ४ | १०,५०० | ७,८७५ | ५,२५० | २,६२५ |
| ३ | **उपयोजित कला** | ४ | १०,५०० | ७,८७५ | ५,२५० | २,६२५ |
| ४ | **कला शिक्षण प्रशिक्षण** | ४ | १०,५०० | ७,८७५ | ५,२५० | २,६२५ |
| ५ | **कला व हस्तव्यवसाय** | | | | | |
| | (i)धातुकाम | २ | ५,२५० | २,६२५ | - | - |
| | (ii) गृहसजावट | २ | ५,२५० | २,६२५ | - | - |
| | (iii) वस्त्रकाम | २ | ५,२५० | २,६२५ | - | - |
| | (iv) मातकाम | २ | ५,२५० | २,६२५ | - | - |
| ६ | **मुलभूत** | ६ | प्रत्येकी रु.५,२५०/- ची सहा बक्षिसे | | | |
| ७ | **दिव्यांग विद्यार्थी** | १ | १०,५०० | | | |
| | | **३१** | | | | |

त्याचप्रमाणे निवड समितीने निवड केल्यानुसार वरील विभागामध्ये विभागनिहाय गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येतील.

महाराष्ट्र राज्यातील कला संचालनालयाच्या अखत्यारीतील शासकीय व शासनमान्य अशासकीय कला संस्थांतील तसेच राज्यातील शासनमान्य व विद्यापीठांशी संलग्नीत कला महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या कलाकृती विद्यार्थी विभागाच्या प्रदर्शनाच्या प्रवेशिका दि.२०/११/२०२५ ते दि.२८/११/२०२५ या कालावधीत doa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात स्विकारल्या जातील. **ऑनलाईन स्वरुपात कलाकृती प्राप्त झाल्यानंतर** ऑनलाईन डिजीटल इमेजेस वरुन प्रदर्शनाकरिता कलाकृतींची निवड केली जाईल. प्रदर्शनाकरिता निवडण्यात आलेल्या कलाकृतींची यादी उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. **प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या मुळ कलाकृती** स्विकारण्याच्या तारखा व ठिकाण उक्त संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या मुळ कलाकृती** संचालनालयाकडून नमूद केलेल्या तारखेस पाठविण्यात याव्यात. नियोजित वेळेनंतर येणाऱ्या कलाकृती स्विकारल्या जाणार नाहीत.

प्रर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती संचालनालयास प्राप्त झाल्यानंतर त्यातून पारितोषिकाकरिता कलाकृतींची निवड करण्यात येईल. पारितोषिक विजेते कलाकारांची यादी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

प्रदर्शनासाठी कलाकृतींचे आकार खालील तक्त्याप्रमाणे असावेत :-

| अ.क्र. | विषय | फ्रेमसह कमीत कमी आकार | फ्रेमसह जास्तीत जास्त आकार |
|---|---|---|---|
| १ | मुलभूत, चित्रकला व रंगकला आणि कला शिक्षण प्रशिक्षण | ४० सें.मी. x ३० सें.मी. | १२० सें.मी. x ९० सें.मी. |
| २ | उपयोजित कला | ४० सें.मी. x ३० सें.मी. | ७५ सें.मी. x ५० सें.मी. |
| ३ | शिल्पकला | ६ घनफुटांपेक्षा जास्त नसावा | जास्तीत जास्त वजन १०० ते १२५ किलोग्राम असावे (ही अट फक्त दगडाच्या शिल्पासाठी आहे.) |

<u>कलाकृती पाठविण्याबाबतच्या सूचना</u> :-

१) या प्रदर्शनात कला संस्थेमधून भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाने आपल्या कलाकृती संस्था प्रमुखांमार्फत doa.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन स्वरुपात पाठविणे बंधनकारक आहे.

२) प्रत्येक कला संस्थेने (शासकीय तथा शासनमान्य अशासकीय आणि विद्यापीठांशी संलग्नीत) कमीत कमी १० कलाकृती पाठवाव्यात अशी अपेक्षा आहे. तथापि, प्रदर्शनासाठी कलाकृती निवडतांना त्यातील कला मुल्यांचा साकल्याने विचार करावा. अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे या मुळ हेतूबरोबरच कला प्रदर्शनाचा दर्जा प्रस्थापित करणे हा महत्वाचा मुद्दा महाविद्यालयाच्या अध्यापकांनी नजरेसमोर ठेवावा. कला संस्थांच्या अधिष्ठाता / प्राचार्यांनी आपल्या कला अध्यापकांच्या सहयोगातून सुयोग्य विचारविनिमय करुन दर्जेदार कलाकृतींची निवड करावी. परीक्षण मंडळाच्या कसोटीस पात्र ठरलेल्या सर्व कलाकृती प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रदर्शनासाठी निवडावयाच्या कलाकृतींच्या संख्येविषयी परीक्षण मंडळावर कोणत्याही प्रकारे मर्यादा घालण्यात येणार नाहीत, याची अधिष्ठाता / प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

**३) पाठविण्यात येणारी कलाकृती ही कुठल्याही कलाकृतींची प्रतिकृती (नक्कल) अथवा अनुकरण असता कामा नये व कलाकृती ही संबंधित स्पर्धकाने तयार केली आहे, असे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी संस्थेच्या अधिष्ठाता / प्राचार्याकडून घेऊन ते प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती या संचालनालयात जमा करताना सोबत आणावे. अशा प्रमाणपत्राशिवाय येणाऱ्या कलाकृती प्रदर्शनासाठी स्विकारल्या जाणार नाहीत.**

४) अश्लील, वादग्रस्त विषय, धार्मिक वाद निर्माण होईल असे विषय, जाती-भेदावर आधारित विषयाच्या कलाकृती प्रदर्शनासाठी स्विकारल्या जाणार नाहीत. तशा सूचना सर्व कलाविद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक संस्था प्रमुखांवर राहील याची नोंद घ्यावी.

५) तक्ता व त्यात उद्धृत केलेली प्रमाणपत्रे संपूर्णपणे भरुन कलाकृतीबरोबर पाठविण्यात यावीत.

६) पाठविण्यात येणाऱ्या चित्रांना व्यवस्थित चौकट (फ्रेम) (माउंट) करुन पाठविण्याची व्यवस्था करावी.

७) विद्यार्थी विभागाचे प्रदर्शन राज्यातील सुनिश्चित केलेल्या एका ठिकाणी दाखविण्यात येणार असल्यामुळे कलाकृतींना काचेची (फ्रेम) चौकट वापरण्यात येऊ नये,

८) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या प्रत्येक कलाकृतीसोबत दोन लेबल असावीत. त्यापैकी एक कलाकृतीच्या मागे चिकटविण्यात येऊन दुसरे धाग्याने कलाकृतीला बांधावे.

९) लेबलवर खालील माहिती देण्यात यावी :-

✂........................................✂................................✂.............,.............

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन रजिस्टर आयडी | : | ............................................... | |
| | विभाग | : | ............................................... | |
| | कलाकृतीचे शिर्षक | | -------------------------------- | |
| | कलाकृतीची विक्री किंमत | | | |

✂...................✂.............................✂.........................✂.......✂.........✂.

१०) ज्या पार्सलाबाबत भाडे आकारणी पडेल अथवा अर्धवट भाडे दिलेले असते, अशी पार्सले स्विकारली जाणार नाहीत.

**११) प्रदर्शनाकरिता निवड झालेल्या कलाकृती पाठविल्यानंतर कलाकृतीबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल. परंतु कुठल्याही नैसर्गिक वा अन्य कारणाने नुकसान झाल्यास, अथवा हरवल्यास त्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. पाठविणाऱ्याने आवश्यक वाटल्यास कलाकृतीचा विमा उतरवावा.**

१२) प्रदर्शनात दाखल होणाऱ्या कलाकृतींचे कॅटलॉग किंवा स्मरणिका किंवा इतर शासकीय प्रसिध्दी पुस्तके इत्यादींसाठी प्रतिकृती तयार करण्याचा हक्क कला संचालनालयाकडे राहील.

**१३) विद्यार्थी विभागात आणून दिलेल्या कलाकृती परत घेऊन जाण्याची व्यवस्था प्रदर्शन समाप्त झाल्यानंतर १० दिवसांचे आत करावी. या मुदतीत कलाकृती नेण्याची व्यवस्था न केल्यास सदर कलाकृतीवर संबंधितांचा हक्क राहणार नाही. तसेच सदर कलाकृतींबाबत योग्य तो निर्णय घेवून त्यावर कार्यवाही करण्याचा हक्क संचालनालयाकडे राहील, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१४) कुठल्याही कारणासाठी प्रदर्शनाच्या मुदतीत कलाकृती परत मिळणार नाहीत. ज्या स्पर्धकांनी विद्यार्थी विभागात कलाकृती पाठविल्या असतील त्यांना व्यावसायिक कलाकारांच्या प्रदर्शनास कोणत्याही विभागात भाग घेता येणार नाही. तसे आढळल्यास अशा कलाकृती प्रदर्शन प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावरुन बाद होतील, याची नोंद घ्यावी.

१५) बक्षिसपात्र व गुणवत्ता प्रमाणपत्रधारक विद्यार्थी कलाकारांना प्रदर्शनाच्या उदघाटन समारंभास उपस्थित राहण्यासाठी व परत जाण्यासाठी ते ज्या संस्थेचे विद्यार्थी असतील त्या स्थळापासून मुख्य प्रदर्शनाच्या स्थळापर्यंत रेल्वेचे (दुस-या वर्गाचे) अथवा साध्या एस.टी. बसचे सवलतीचे भाडे शासनातर्फे देण्यांत येईल. **प्रदर्शन स्थळापर्यंत येतानाचे प्रवास भाड्याचे तिकिट जमा करणे आवश्यक आहे**.

१६) प्रदर्शनासाठी निवड झालेल्या, प्रदर्शनासाठी परिक्षकांनी अंतिम पारितोषिक प्राप्त ठरविलेल्या कलाकृतीबाबतचे सर्व निर्णय हे कला संचालक आणि प्रदर्शन समितीसह परीक्षक समितीचे असतील.

**१७) अंशकालीन अभ्यासक्रमाचे विद्यार्थी तसेच जोड अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांस या प्रदर्शनात भाग घेता येणार नाही.**

१८) महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात भाग घेतलेल्या कलाकृतीबाबत काही वाद अथवा पेचप्रसंग उद्भवल्यास त्यावर निर्णय घेण्याच्या अंतिम अधिकार हा प्रदर्शन समिती तसेच कला संचालकांचा राहील.

---------- x ----------